# <u>न्यायाधीश, कामगार न्यायालय, रत्नागिरी यांचे न्यायासनासमोर</u>

तक्रार (अ.का.प्र.) क्र. २/२०२६
CNR NO. MHLC0800000082026

**श्री. भूषण देविदास पगार,**
राहणार : एस. टी. डेपो, दापोली,
जिल्हा रत्नागिरी. **.. तक्रारदार.**

विरुध्द

१. **विभाग नियंत्रक**
**राज्य परिवहन मंडळ रत्नागिरी** **.. सामनेवाला क्र.१**

२. **मा. विभागीय वाहतूक अधिकारी**
राज्य परिवहन, रत्नागिरी. **.. सामनेवाला क्र.२**

३. **मा. विभागीय वाहतूक अधिक्षक** **.. सामनेवाला क्र.३**
राज्य परिवहन, रत्नागिरी.

**<u>कोरम</u> :— <u>श्री सुमित वि. जोशी, न्यायाधीश.</u>**

**<u>प्रतिनिधीत्व</u> :—** श्री. ए. बी. कांबळे, तक्रारदार यांचेतर्फे वकील.
श्री. म. मु. कदम, सामनेवाला क्र. १ ते ३ यांचेतर्फे वकील.

## <u>निशाणी यु. २ वर आदेश</u>

(न्यायदान कक्षात दि. १७/०३/२०२६ रोजी जाहीर)

१. तक्रारदार यांनी प्रस्तुतचा अर्ज महाराष्ट्र कामगार संघटनांना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा बंदी अधिनियम, १९७१ (ज्यास पुढे 'उक्त कायदा' असे संबोधण्यात आले आहे) चे कलम ३० पोटकलम २ अन्वये अंतरीम मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>तक्रारदार यांची बाजू अशी की:—</u>**

२. तक्रारदार व सामनेवाले यांचेमध्ये 'मालक' व 'कामगार' असे नातेसंबंध असुन ते अनुक्रमे 'कामगार' व 'उद्योग' या संज्ञांमध्ये येतात.

३. तक्रारदार यांच्या कथनानुसार, तक्रारदार हा सामनेवाला यांच्याकडे चालक / वाहक पदावर दि. २६.०६.२०१८ पासून कार्यरत आहे. सामनेवाला क्र. ३ यांनी पत्र क्र. राप/ विनिर/वाह/अपराध /१९८/१०१—२४/५३६, दि.२३.०२.२०२६ अन्वये आरोप पत्र क्र. राप/ विनिर/वाह/ अपराध/१९८/१०१—२४/६३८, दि.०६.०५.२०२४ प्रकरणी तक्रारदार यांना अयोग्य प्रकारे व बेकायदेशीरपणे कारणे दाखवा नोटिस बजावून बडतर्फ करण्याचे ठरविले आहे. तक्रारदार यांना उपरोक्त नोटिस दि. २८.०२.२०२६ रोजी प्राप्त झाली असून सामनेवाला यांनी अनुचित कामगार प्रथांचा अवलंब करून बेकायदेशीरपणे खातेचौकशी केलेली आहे.

४. तक्रारदाराच्या पुढील कथनानुसार दि. २९.०३.२०२४ रोजी तक्रारदार हा शिर्डी ते दापोली या मार्गावरील बस क्र. एम.एच ०७ सी ७२५३ वर नियोजित कामगिरी करीत असताना बस ही टप्पा क्र. ४२ येथे आली असता मार्ग तपासणीस यांनी बस तपासणी केली असता स्वारगेट ते माणगांव असा प्रवास करणारे एकाच गटातील दोन प्रवाशी यांचे कडून प्रवासासाठी रू.२६५/— तसेच पिरंगूट ते निजामपूर या प्रवासाठी रू. १९५/— स्विकारून त्यांना को—या कागदावर पेनाने स्वहस्ताक्षरामध्ये रू. २६५/— व रू. १९५/— असे लिहून दिले. वरील प्रमाणे तक्रारदाराने एकूण रक्कम रू. ४६०/— रक्कमेचा अपहार केल्या बाबत मार्ग तपासणीस यांनी दि. ०१.०४.२०२४ रोजी दिलेल्या अहवालामध्ये नमूद केले आहे.

५. तक्रारदाराच्या कथनाप्रमाणे, त्याने कोणताही अपहार केला नसून खोटया व खोडसाळ जबाबावरून त्याचे विरूध्द कारवाई करण्यात आली. तक्रारदारास घटनेची खातरजमा न करता निलंबित करण्यात आले होते. तक्रारदारा विरूध्द करण्यात आलेल्या खातेचौकशी मध्ये नैसर्गीक न्यायतत्वाप्रमाणे संधी देण्यात आली नाही. सामेनवाला यांनी कर्मचारी वर्ग खाते परिपत्रक १६/२००५ ऐवजी नविन व सुधारीत परिपत्रक क्र. ५०/२०१९ प्रमाणे बेकायदेशी खातेचौकशी केली असून चौकशी अधिकारी यांनी अधिकार नसताना तक्रारदारास वादातील नोटिस दिली असून सर्व प्रक्रिया बेकायदेशीपणे पार पाडली आहे. तक्रारदारास संरक्षण न दिल्यास सामनेवाला हे त्याला सेवेतून बडतर्फ करतील व त्यामुळे त्याचे कधीही भरून न येणारे नुकसान आहे. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. सामनेवाला यांनी नि. क्र. सी—३ कडे म्हणणे देवून तक्रारदाराने केलेल्या कथनांचा इनकार केला. सामेनवाला यांच्या कथनाप्रमाणे दि. २९.०३.२०२४ रोजी मार्ग तपासणीस यांनी तक्रारदार कामगीरीवर असलेली बस तपासणी केली असता तक्रारदाराने को—या कागदावर स्वहस्ताक्षराने तिकीट रक्कम नमूद करून प्रवाशांना दिल्याचे आढळून आले. तक्रारदाराने रू. ४६०/— रक्कमेचा अपहार केला. मार्ग तपासणीस यांनी दिलेल्या अहवालावरून तक्रारदाराविरूध्द दि. ०६.०५.२०२४ रोजी आरोपपत्र बजावण्यात आले. तक्रारदार विरूध्द कायदेशीर पध्दतीने व नैसर्गीक न्यायतत्वानुसार योग्य ती संधी देवून खाते चौकशी पूर्ण करण्यात आली. तक्रारदाराने अपहार केल्याचे सिध्द झाल्यामुळे त्याचे विरूध्द कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे. तक्रारदाराने यापुर्वीसुध्दा अशाच प्रकारचा अपहार केला होता व त्याबाबत कामगार न्यायालयात तक्रार प्रलंबित आहे.

तक्रारदाराच्या बाजूने प्रथमदर्शनी केस नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

७. वरील परिस्थितीत उपस्थित होणारे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे :—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे का ? | होकारार्थी |
| २ | न्यायाचा समतोल तक्रारदाराच्या बाजूने आहे का? | होकारार्थी |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास तक्रारदार यांचे अपरिमीत नुकसान होईल काय? | होकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबतः—**

८. मुद्दा क्र. १ ते ४ हे परस्परांशी संबंधीत असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची चर्चा एकत्रीत करण्यात आली. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली.

९. प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार यांचेवर ठेवण्यात आलेला आरोप पाहाता, तक्रारदाराने दि. २९.०३.२०२४ रोजी कामगिरीवर असताना प्रवाशांना को—या कागदावर पेनाने तिकीट रक्कम लिहून दिली असून रक्कम रू. ४६०/— रक्कमेचा अपहार केला. तक्रारदारा विरूध्द मार्ग तपासणीस यांनी दि. ०१.०४.२०२४ रोजी दिलेल्या अहवालाप्रमाणे आरोपपत्र ठेवण्यात आले. करण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशीमध्ये तक्रारदारा विरूध्द दोषसिध्दी झाल्यामुळे दि. २३.०२.२०२६ रोजीची कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे.

१०. तक्रारदाराच्या कथनाप्रमाणे सामनेवाला यांनी बेकायदेशीरपणे

खातेचौकशी केली असून तक्रारदारास त्याची बाजू मांडण्याची संधी दिलेली नाही. तक्रारदाराने मुळ तक्रार दाखल केल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज निकाली होईपर्यंत त्याला वादातील नोटिसप्रमाणे सेवेतून बडतर्फ करण्यात येवू नये यासाठी अंतरिम संरक्षण देण्यात आले आहे. वादातील नोटिस कायदेशीर आहे किंवा नाही ही बाब पुराव्याअंती ठरणार आहे परंतू, आजरोजी तक्रारदाराच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे का? हे पाहणे आवश्यक आहे. तक्रारदाराच्या कथनाप्रमाणे त्याने कोणताही अपहार केलेला नाही.

११. तक्रारदाराने नि. क्र. यु—४/१ कडे दि. ०६.०५.२०२४ रोजीचा निलंबन आदेश दाखल केला आहे. सदर आदेश पाहता बस तपाणी अधिकारी यांच्या अहवालावरून कोणतीही चौकशी न करता तक्रारदारास निलंबित केल्याचे दिसून येते तसेच नि.क्र. यु—४/२ कडे आरोपपत्र देण्यात आले आहे. तक्रारदारा विरूध्द अनधिकृत तिकीटांची विक्री करणे, कमी मुल्यांची तिकीटे देणे, गैरशिस्तपणे, महामंडळाची हानी व प्रशासकिय आदेशांचा भंग करणे असे आरोप ठेवण्यात आले. सदर आरोपपत्रांनुसार, सक्षम प्राधिकारी, विभागीय वाहतूक अधिकारी यांनी **विभागीय वाहतूक अधिक्षक** यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली. वरील प्रमाणे तक्रारदारा विरूध्द विभागीय वाहतूक अधिक्षक यांनी चौकशी करण्याची होती.

१२. दि. ०१.०४.२०२४ रोजीच्या मार्गतपासणीस यांनी दिलेल्या अहवालानूसार तक्रारदाराने अपहार केला. तक्रारदाराने दि. २९.०३.२०२४ रोजी को—या कागदावर तिकीट रक्कम लिहून दिल्याचा जबाब दिला असून प्रवासी नामे विश्रांती चव्हाण व संतोष सोंडकर यांनी दिलेल्या जबाबाप्रमाणे त्यांनी तिकीटाचे पैसे तक्रारदाराकडे दिले होते. बस तपासणी पुर्वीचा व

नंतरचा तिकीटांचा अहवाल पाहता पुर्वी २१ तिकीटे देण्यात आली होती व नंतर २५ तिकीटे देण्यात आली असून वरील प्रमाणे तक्रारदाराने ४ तिकीटे दिली नव्हती. तक्रारदारा विरूध्द प्राथमिक सुनावणी दि. २६.०६.२०२४ रोजी घेण्यात आली असून त्याने आरोप अमान्य केला. चौकशी अधिकारी यांनी अहवालकर्ते यांचा जबाब नोंदविला असून तक्रारदारातर्फे उलटतपास घेण्यात आला होता. तसेच तक्रारदाराचा जबाब दि. ०७.०२.२०२५ रोजी घेण्यात आल्याचे दिसून येते परंतू, सदर जबाब आगार व्यवस्थापक रा.प.चिपळूण यांच्या दालनात घेण्यात आला. तक्रारदाराच्या कथनाप्रमाणे त्याला उपरोक्त जबाबाच्यावेळी नोटिस देण्यात आली नाही. सामनेवाला यांनी नि.क्र.सी—६ सोबत अ.क्र. २७ कडील दि. १६.०१.२०२५ रोजीची नोटिस पाहता, ती तक्रारदारास मिळाल्याबाबत पोहोच नाही. तसेच सदर नोटिस प्रमाणे तक्रारदारास सुनावणीसाठी रत्नागिरी येथील कार्यालयात हजर राहण्यासाठी सांगितलेले असताना चिपळूण येथील कार्यालयात जबाब नोंदविल्याचे कारण स्पष्ट करण्यात आले नाही.

१३. तक्रारदारातर्फे उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांनूसार सामनेवाला यांनी सुधारीत परिपत्रक ५०/२०१९ प्रमाणे बेकायदेशीरपणे चौकशी केली आहे. नि. क्र. यु—४/८ कडील औद्योगिक न्यायालय, मुंबई यांच्या तक्रार यु.एल.पी. प्रमाणे ३३/२०२० मधिल दि. १७.०२. २०२० रोजीच्या आदेशानुसार सुधारीत परिपत्रकाचा अंमल करण्यात येवू नये. असा स्थगिती आदेश देण्यात आला आहे. सामनेवाला यांच्या दि. ११. ०३.२०२० रोजीच्या परिपत्रक क्र. ८/२०२० नुसार अपराध प्रकरणी कारवाई ही परिपत्रक क्र. १६/२००५ प्रमाणे करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. वरील प्रमाणे प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी सुधारीत

परपित्रकाप्रमाणे कारवाई केली असल्याचे दिसून येते.

१४. चौकशीअंती चौकशी अधिकारी यांनी निष्कर्ष नोंदवून अहवाल देणे अपेक्षित असताना सक्षम प्राधिकारी यांनी अहवाल दिल्याचे व शिक्षा प्रस्तावित केल्याचे दिसून येते. सुधारीत परिपत्रक क्र. ५०/२०१९ मधिल विभागीय चौकशीची कार्यपध्दतीसाठी नमूद केलेला मुद्दा क्र. १६ प्रमाणेचौकशी अधिकारी यांचे कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांनी कारणे दाखवा नोटिस देणे अपेक्षित होते परंतू, उपरोक्त परिपत्रकाचा भंग करून सक्षम प्राधिकारी यांनी स्वत: चौकशीचा अहवाल दिला असून कारणे दाखवा नोटिस दिल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. वरील प्रमाणे खातेचौकशी दरम्यान सीगिती देण्यात आलेल्या परिपत्रक क्र. ५०/२०१९ प्रमाणे चौकशी केल्याचे दिसून येते अशा परिस्थितीत तक्रारदाराच्या बाजूने प्रथमदर्शनी केस असल्याचे स्पष्ट होते.

१५. वादातील कारणे दाखवा नोटिस प्रमाणे कारवाई केल्यास निश्चितपणे तक्रारदाराचे नुकसान होणार आहे. उलटपक्षी तक्रारदारास करण्यात आलेली खातेचौकशी योग्य होती किंवा नाही हे ठरवेपर्यत किंवा तक्रारीचा निकाल लागेपर्यंत संरक्षण दिल्यास सामनेवाला यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तक्रारदाराने को—या कागदावर तिकीट रक्कम लिहून दिली याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही परंतू, करण्यात आलेली खातेचौकशी प्रथमदर्शनी बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होत असल्याचे सोईचा समतोल तक्रारदाराच्या बाजूने असून अर्ज नामंजूर झाल्यास त्याचे अपरिमीत नुकसान संभवत असल्याने मी मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ साठी पुढील आदेश देत आहे.

# <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्रमांक यु—२ मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ ते ३ यांनी मुळ तक्रारीचा अंतिम निकाल लागेपर्यंत दि. २३.०२.२०२६ रोजीच्या कारणे दाखवा नोटिस प्रमाणे तक्रारदारा विरूध्द कोणतीही कारवाई करू नये अशी अंतरिम मनाई करण्यात येते.

( सुमित वि. जोशी )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, रत्नागिरी

दिनांक :— १७/०३/२०२६